# महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक, सामाजिक चळवळीतील योगदान

**यमुना चंद्रकांत ढेंबरे**
संशोधक विद्यार्थिनी (पीएचडी.)
जालना समाजकार्य महाविद्यालय,
जालना.
dhyamuna@gmail.com

**प्रस्तावना:**

ज्योतीराव गोविंदराव फुले (जन्म एप्रिल ११ इसवी सन 1827 नोव्हेंबर,मृत्यू 28 इसवी सन 1890). महात्मा फुले नावाने प्रसिद्ध होते. मराठी लेखक, विचारवंत आणि समाज सुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्याला केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्त रोवली. जनतेने त्यांना "महात्मा" ही उपाधी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इसवी सन १८८८ या साल मिळाली." शेतकऱ्यांचा आसूड" हा ग्रंथ महात्मा फुले यांनी लिहिला होता..

**शैक्षणिक विचार व कार्य:**

महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत.

विद्याविना मती गेली।
मतीविना नीती गेली।
नितीविना गती गेली।
गती विना वित्त गेले। वित्तविनाशुद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।.

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्य आणि समाजातील जातीभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इसवी सन 1848 साल पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली.

महाराष्ट्रातील शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इसवी सन १८५२ मध्ये शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे, पण ज्योतिराव आपल्या भूमिकावर ठाम होते. ज्योतिरावांनी पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. शाळेच्या मुख्याध्यापक पदी आरुढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई. त्याचप्रमाणे स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार स्वातंत्र् समता आणि बंधुता त्रयीवर नितांत भरोसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात

आवाज उठविणारे महात्मा फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे "मार्टिन ल्युथर "म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मॅकोलेच्या खलीत्यास कडाडून विरोध केला. शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे. या विचारास फुलेंचा विरोध होता. कारण इंग्रजांचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील शिक्षण द्यावे. 'आधी कळस मग पाया' असे न होता 'आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षण प्रणाली असण्यावर महात्मा फुलेंचा आग्रह होता ..

प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण हे सूत्र अमलात आणावे यावर भर देण्यात आला.

**महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार :**

१)स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा. २)प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत.

३) प्रशिक्षित शिक्षकांची तरतूद करणे.

४) प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे.

५) ग्रामीण भागातील मुला मुलींचे शिक्षण.

६) राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण.

७) शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल विचार.

८) व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण.

९) त्रिभाषा सूत्रांचा अवलंब.

१०) शिष्यवृत्ती व वस्तीग्रहांची सुविधा.

११) शिक्षण विषयीक ज्ञान व विचार..

**स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा:**

पूर्वीच्या काळामध्ये या परिस्थितीत स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे अधर्मच करणे होय. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमच उघडली जावी म्हणून महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षण म्हणून सर्वप्रथम हाती घेतली . शिक्षण हे समर्थ स्त्री म्हणून  जगण्यासाठी दिले जावे. स्त्रियांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे होय. स्त्रियांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे ओळखून महात्मा फुलेंनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन आद्य शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली. आणि स्त्री शिक्षण मोहिमेत सुरुवात केली ..

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, प्राथमिक शिक्षण हे प्रत्येक बालकाचा हक्क आहे. आणि त्यामुळे हे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच महात्मा फुले प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मूलभूत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. ही मागणी त्यांनी 19 ऑक्टोबर 1882 मध्ये हंटर शिक्षण आयोगा नंतर आयोगा पुढे एका शिक्षणावर अधिक भर देईल तर नीतीच्या आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने किती तरी चांगले लोक शिकून तयार  होताना मुळीच अडचण पडणार नाही. या विचारातून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यावर भर दिला.

**प्राथमिक शिक्षकांची तरतूद करणे:**

प्राथमिक शिक्षणात सक्तीचे व मोफत केल्यास विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होती. आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे देखील आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रथम आवाज उठवणारे महात्मा फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे यावर अधिक भर देण्यात आला प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे सरकारी नोकरीमध्ये सर्व वरिष्ठ वर्गांनी मक्तेदारी आहे, असे दिसून आल्यावर शिक्षण खालच्या वर्गातील तळागाळातील लोकांना मिळावे यासाठी महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गात दिल्यावर अधिक भर उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण  जनतेच्या प्राथमिक शिक्षणातून उद्याची भावी पिढी घडत असते आणि आज जे प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत करण्यात आले आहे त्यामागे महात्मा फुलेंचे विचार असलेले दिसून येतात. आपल्या देशामध्ये आजची परिस्थिती लक्षात घेता कमी शिकलेली अध्यापक व अनुभव कमी असलेले शिक्षक प्राथमिक स्तरावर अध्यापन करताना दिसतात. आणि अधिक अनुभवी व विषय तज्ञ अध्यापक वर्ग वरच्या वर्गासारखा उच्च स्तर अध्यापन करतात .तेव्हा वेळोवेळी प्राथमिक शिक्षण अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देणे ही काळाची गरज बनली आहे. आणि त्या दृष्टिकोनातून विचार महात्मा फुलेंनी व्यक्त केले.

**ग्रामीण भागातील मुला मुलींचे शिक्षण:**

बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये राहत असल्याने त्यांच्या शिक्षणाची महात्मा फुले यांना अधिक काळजी वाटत असे. दोन मार्च 1888 मध्ये महात्मा फुले म्हणाले होते की आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे.

**राष्ट्र निर्माण होण्यासाठी शूद्रांना शिक्षण:**

आपल्या देशात बहुजन समाज हा अजन व  अडाणी  आहे. शूद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्र बनू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर अधिक भर होता.

**शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल:**

महात्मा फुले यांच्या मते शिक्षण पद्धती बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित करणारी होती .तेव्हा शिक्षण प्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणाऱ्या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनणारे उद्योग हे जीवन उपयोगी शिक्षण देण्यात यावे.

**महात्मा फुले यांचे सामाजिक चळवळीमध्ये योगदान :**

महात्मा फुले यांनी महिला शिक्षणावर पहिल्यांदाच अधिक भर दिलेला आपल्याला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी असलेला दिसून येतो. तसेच महात्मा फुले यांनी सती  प्रथेला कडाडून विरोध केलेला दिसतो. आणि महात्मा फुले हे केशवपण, देवदासी इत्यादी प्रति  कडाडून विरोध करताना आपल्याला दिसलेले आहेत .त्यांच्यामुळे आज अनेक समाजातील अनेक दुष्ट रूढी, प्रथा ,परंपरा यांना आळा

बसलेला आहे .तसेच महात्मा फुले यांना जातीयते विरुद्ध त्यांनी कडाडून आवाज उठवला होता. महात्मा फुले हे जातीभेदा विरुद्ध लढत होते .महात्मा फुले यांनी विधवा पुनर्विवाह, बालहत्या, बालविवाह, मुरळ्या देवदासी प्रथा अशा समाजातील दुष्ट प्रथा आणि परंपरेला आळा बसवला त्याविषयी कायदेशीर तरतूद करण्यासाठी महात्मा फुले यांनी योगदान दिलेले आहे. बाल जठर विवाह झालेल्या कित्येक बाल विधावा समाजामध्ये होत्या त्यांना सती जावे लागत असे, किंवा त्यांचे केशवपण करून त्यांना कुरूप बनवण्यात येई. आणि समाजातील काही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांच्या त्या बळी पडत असत आणि त्यातून गर्भवती झालेल्या ज्या बाल विधवा किंवा विधवा होत्या ज्या कुमारी माता होत्या त्यांचे अपत्य त्यांना नकोसे वाटायचे आणि त्या आपत्यांना आपल्यासारखेच समाजात हीन प्रवृत्तीचे जीवन जगण्यासाठी समाज मजबूर करेल .या विचाराने त्या बालहत्या करण्यास प्रवृत्त व्हायच्या. परंतु महात्मा फुले यांनी हे जाणले आणि त्यांच्यासाठी बालहत्या प्रतिबंधक ग्रहाची सुरुवात महात्मा फुले यांनी सर्वप्रथम केली. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या महान लोकांची मदत आणि विचार घेतले होते या बालहत्या प्रतिबंधक ग्रहांमध्ये सावित्रीबाई देखील काम करू लागल्या आणि त्या गरोदर माता आणि कुमारी गरोदर मातांसाठी सावित्रीबाई या अहोरात्र तिथे काम करत होत्या. त्यांची सेवा करत होत्या. आणि त्या गर्भवती मातांचे बाळंतपण देखील सावित्रीबाई यांनी केली होते. आणि तिथल्याच आश्रमातील एका ब्राह्मण विधवा यांचा मुलगा सावित्रीबाईंनी दत्तक घेतला. आणि पुढे त्यांचे नाव यशवंत असे ठेवण्यात आले होते.

समाजातील ज्या बाल विधवा असत त्यांच्यासाठी महात्मा फुले यांनी आश्रम निर्मिती केली होती. तसेच ज्या विधवा बालपणीच बाल विधवा होतात ज्या कुमारी माता असत त्यांच्या मुलांसाठी शिक्षण हा तिसरा डोळाच मानले जाते त्यामुळेच महात्मा फुले यांनी कोणत्याही एका व्यक्तीची मुक्तेदारी न बनता सर्वांना शिक्षण मिळावे. शिक्षणाचा प्रसार होऊन ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी महात्मा फुलेंनी योगदान दिले. महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथांच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली अशा प्रकारे महात्मा फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करताना स्वतःच्या घरादाराचाही विचार न करता काम केल्याने म्हणून आज आपल्या समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे. अशा शिक्षण तज्ञाला समाज सुधारकाला शिक्षण महर्षीच्या कार्याला कोटी कोटी वंदन.

**संदर्भ:**

विकिपीडिया....